# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

शिक्षणाचा अधिकार
सर्व शिक्षा अभियान
सारे शिकूया, पुढे जाऊया

जा.क्र. :– 274 / शि.वि./सशिअ. दिनांक – 10/09/2014

प्रति,

1) कनिष्ठ अभियंता, झोन क्र. ..........
2) श्री/श्रीमती ........................................ शाळा निरिक्षक झोन क्र. .........
3) श्री ..................................... शहर साधन समन्वयक केंद्र क्र. ..........
4) सर्व साधन व्यक्ति, यूआरसी. 3 ते 5
म.न.पा., नागपूर

**विषय :– नागपूर महानगरपालिकेच्या शाळांमध्ये मुला–मुलीकरीता स्वतंत्र स्वच्छतागृहांची सुविधा बाबत सद्य स्थिती बाबत चा अहवाल सादर करणे बाबत.**

**संदर्भ :– अ.शा.पत्र क्र. मप्राशिप/सशिअ/बांध KGBV/2014–15/2423, दि. 9/7/2014**

सर्व शिक्षा अभियान व संपूर्ण स्वच्छता अभियानांतर्गत मोठया प्रमाणात भौतिक सुविधा व स्वच्छतागृहाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

प्रत्येक शाळेमध्ये मुला–मुली स्वतंत्र स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्यासाठी भारत सरकारने **"स्वच्छ विद्यालय व बेटी बचाओ, बेटी पढावो"** हा महत्वाकांक्षी कार्यक्रम जाहिर केला आहे. मा. मंत्री मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी दिनांक 26 ऑगष्ट, 2014 रोजी राष्ट्रीय स्तरावरील शिक्षण सचिव व राज्य प्रकल्प संचालक यांच्या एक दिवसीय परिषदेत प्रत्येक शाळेमध्ये मुला–मुलीकरीता वापरण्यायोग्य स्वच्छतागृह उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्या अनुषंगाने आपल्या कार्यक्षेत्रात एक देखील शाळा स्वच्छतागृहा विना किंवा वापरण्यायोग्य नसलेली स्वच्छतागृह अशी असणार नाहीत यासाठी आपण प्रत्येक शाळेत प्रत्यक्ष भेट देऊन उपलब्ध असलेल्या स्वच्छतागृहाची सद्य स्थिती तपासण्यात यावी. किरकोळ दुरूस्ती असल्यास शाळा देखभाल दुरूस्ती अनुदानातून सदर खर्च करून स्वच्छतागृह वापरण्यायोग्य असल्यांची खात्री करून त्यांचे छायाचित्र कार्यालयास सादर करावे.

मोठी दुरूस्ती उद्‌भवल्यास शाळा देखभाल दुरूस्ती अनुदान कमी पडत असल्यास लोकवर्गणी किंवा झोन स्तरावर त्वरीत प्रस्ताव पाठवून अतिशिघ्र कार्य करून घ्यावे. ज्या शाळेस स्वच्छतागृह बांधकाम करणे आवश्यक असल्यास बांधकाम करणेसाठी जागेची निवड करून शाळा व्यवस्थापन समितीचा ठराव, झोन कनिष्ठ अभियंता यांचे कडून बांधकामाचे प्राकल्न व प्रस्ताव त्वरीत सादर करण्यात यावे. याकामी झोन शाळा निरिक्षक, शहर साधन

केंद्रातील समन्वयक, साधन व्यक्ति तसेच झोन कनिष्ठ अभियंता, संबंधीत शाळेचे मुख्याध्यापक यांची जबाबदारी निश्चित करण्यात येते. सदर कार्याचा दर आठवडयाचा अहवाल मा. आयुक्तांना सादर करावयाचा असल्याने विशेष मोहिम हाती घेण्यात यावे. सदर कार्यास विलंब होणार नाही याची दक्षता घ्यावी.

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर

**प्रतिलिपी : सविनय माहितीस्तव सादर :–**

1. मा. राज्य प्रकल्प संचालक, मप्राशिप. मुंबई
2. मा. आयुक्त, महानगरपालिका नागपूर
3. मा. अपर आयुक्त, महानगरपालिका नागपूर
4. मा. उपायुक्त, महानगरपालिका नागपूर

**प्रत : उचित कार्यवाहीस्तव रवाना व सद्यस्थितीची माहिती सादर करण्यास्तव**

5. सर्व मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका प्राथ/उच्च प्राथ/माध्यमिक शाळा म.न.पा. नागपूर

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका नागपूर